3 ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !

पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक २८४ वा ● गुरुवार, ता.१० एप्रिल २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

रयत समाचार पोर्टल
Scan QR Code
रयत समाचार चॅनल
Scan QR Code
इंग्रजी रयत समाचार वाचण्यासाठी
Scan QR Code

## वैद्यकीय आयोगाने डॉ. केळकर यांची मान्यता रद्द करावी, दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल प्रकरण विशाल विमल यांची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जी कारभारामुळे गेल्या आठवड्यात एका तरुण महिलेचा प्रसुतीच्या दरम्यान मृत्यू झाला. सदर महिलेकडे दिनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या प्रशासनाने आणि डॉक्टरने प्रसुतीसाठी ऍडमिट होताना सुमारे दहा लाख रुपये डिपॉझिटची मागणी केली होती. मात्र सदर महिला, कुटुंबीय नातेवाईक यांनी दहा लाख रुपयांऐवजी तीन लाखांची तजवीज करून देखील त्यांना ऍडमिट करून घेतले नाही. त्यामुळे सदर महिलेला अन्य हॉस्पिटलमध्ये जावे लागले. या सगळ्या प्रक्रियेमध्ये सदर महिलेचा वेळ गेला आणि त्यामुळे सदर महिलेच्या प्रसुतीसंबंधी अनेक गुंतागुंतीच्या अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे सदर महिलेचा प्रसूती दरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणामुळे दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जी कारभारावर विविध क्षेत्रातून रोष व्यक्त होत आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणाचा खुलासा करण्यासाठी रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. धनंजय केळकर यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, रुग्णालयामध्ये ऍडमिट होताना रुग्णांनी भरून द्यावयाच्या फॉर्ममध्ये डिपॉझिट रक्कम डॉक्टरांनी लिहिण्याची पद्धत नाही. मात्र ती डॉ. सुश्रुत घैसास यांच्याकडून लिहिली गेली. कारण राहू, केतू त्यांच्या डोक्यात आले म्हणून दहा लाख रुपये ते लिहून गेले, असा अशास्त्रीय खुलासा डॉ. धनंजय केळकर यांनी केला आहे. कोणताही शास्त्रीय आणि व्यवहारिक आधार नसलेल्या ज्योतिषात राहू, केतू हे दोन ग्रह मानले आहेत. मात्र खगोलशास्त्रामध्ये राहू, केतूला ग्रह म्हणून मान्यता नाही. आणि खरे तर कोणतेही ग्रह हे पृथ्वीवरील मनुष्यावर काहीही परिणाम करत नाहीत, हे शास्त्रीय पद्धतीने स्पष्ट झालेले आहे. रुग्णालयाचे जबाबदार म्हणून डॉ. धनंजय केळकर यांनी केलेला दावा हा डॉ. सुश्रुत घैसास यांच्याकडून माहिती घेऊनच केलेला असणार आहे. त्यामुळे विज्ञान शाखेचे असणारे डॉ. धनंजय केळकर आणि डॉ. सुश्रुत घैसास यांना ग्रहांसंबंधी शास्त्रीय माहिती नसणे हे अत्यंत धक्कादायक आहे. पूर्वपरंपार त्यांच्यावर असणारे संस्कार हे शिक्षणाने देखील गेलेले नाही, याचा त्यांच्या वक्तव्यातून पुरावा मिळतो. अंधश्रद्धाळू, कर्मकांडी आणि ब्राह्मण्यवादी प्रभाव डॉ. धनंजय केळकर यांच्यावर असल्याने त्यांनी राहू, केतू डोक्यात आल्याने दहा लाख रुपये डिपॉझिट रुग्णाने भरण्यासंबंधीची घटना घडल्याचे वक्तव्य केले आहे. स्वतःच्या चुकांची जबाबदारी झटकून त्या चुका राहू आणि केतूच्या माथी मारणे, यामागे चालूगिरी, कावेबाजपणा आणि धूर्तपणा आहे. भविष्यात एखाद्या रुग्णावर निदान, उपचार करत असताना रुग्णालय आणि डॉक्टरांकडून एखाद्या रुग्णावर विपरीत परिणाम झाले अथवा एखादा रुग्ण दगावला तर हे रुग्णालय आणि डॉक्टर हे सदर गोष्ट ही शनी, मंगळ अथवा राहू, केतूमुळे घडल्याचे सांगून हात वर करणार असल्याचे दिसते. आणि मग सदर चुकीसंबंधी न्यायालयाने नक्की शनी, मंगळ, राहू,केतूला शिक्षा ठोठावायची का ? असा प्रश्न पडतो. एकूण वैद्यकशास्त्र हे कार्यकारणभाव, वैज्ञानिक दृष्टिकोन या पद्धतीवर उभे आहे. आजारांचे निदान, उपचार, शस्त्रक्रिया, औषध निर्माण हे सर्व वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या पद्धतीने घडत असते. याचे सर्व शिक्षण डॉ. धनंजय केळकर आणि डॉ. सुश्रुत घैसास यांनी घेऊन देखील ते शास्त्रीय उपचार पद्धती विसरले की काय असा प्रश्न पडतो. डॉ. धनंजय केळकर यांनी केलेल्या बेकायदेशीर अशास्त्रीय आणि दिशाभूल करणाऱ्या वक्तव्यामुळे समाजामध्ये अंधश्रद्धा आणि कर्मकांड यांचे समर्थन घडले आहे. उद्या वैद्यकशास्त्रातील इतर लोकही स्वतःच्या चुकांचे खापर हे राहू, केतुवर फोडून मोकळे होतील. त्यामुळे असा अशास्त्रीय दावा केल्याससंबंधी डॉ. धनंजय केळकर डॉ. सुश्रुत घैसास यांची उपचार, निदान करण्यासंबंधीची मान्यता राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने रद्द करावी, अशी आम्ही मागणी करत आहोत, असे अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ कार्यकर्ते विशाल विमल म्हणाले.

## पदाची प्रतिष्ठा मलिन होणार नाही, याची काळजी घ्यावी- आ.पवार


**कर्जत । रिजवान शेख**




कर्जत नगरपरिषदेमध्ये घडलेल्या घडामोडीनंतर कर्जत जामखेडचे राजकारण चांगलेच ढवळून निघाले. विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत प्रतिक्रिया दिली. त्यानंतर कर्जत- जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी संताप व्यक्त केला की, राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष आणि विधानपरिषदेचे सभापती ही घटनात्मक पदं असून महाराष्ट्रात या पदांवरील व्यक्तींना विशेष मानसन्मान आहे. कारण या पदांवरील आजवरच्या सर्वांनीच स्वतःला सक्रिय राजकारणापासून दूर ठेवत या पदांचा मानसन्मान वाढवला. पण अलीकडच्या काळात या पदांवरील व्यक्तींनी राजकीय भूमिका घेऊन पदाचं अवमूल्यन करण्याचा विडा उचलला की काय, अशी शंका येते. विधानपरिषदेच्या सभापती महोदयांनी तर विधिमंडळातील दालनात कर्जत नगरपंचायतीच्या काही नगरसेवकांसोबत पत्रकार परिषद घेऊन एका क्षणात विधिमंडळाच्या प्रथा, परंपरा आणि संकेतांना धुळीस मिळवलं.. वास्तविक प्रथा परंपरा, निष्ठा, विचार यांची बरोबरी पैशात कधीही होऊ शकत नाही, त्यामुळं कर्जत-जामखेडने पैशांपेक्षा प्रथा, परंपरा, निष्ठा आणि विचार कायमच जपला. पण आज एक मात्र बरं झालं, यानिमित्ताने फोडाफोडीमागे कुणाचा चेहरा आहे, हे उघड झालं. आता अपेक्षा एकच आहे, त्यांनी राजकारण जरूर करावं पण घटनात्मक पदावर राहून या पदाची प्रतिष्ठा मलिन होणार नाही याची आणि कर्जत जामखेडच्या प्रतिष्ठेला धक्का बसणार नाही, याची काळजी घ्यावी, अशी प्रतिक्रिया आ.रोहित पवार यांनी दिली.

## विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जगातील पहिला पुतळा

### दोन सामान्य माणसांच्या हस्ते भाई माधवराव बागल यांनी केले अनावरण



भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात काही घटना अशा असतात ज्या केवळ स्मृती नव्हे, तर ठरवून जागवलेल्या प्रेरणा असतात. अशाच घटनांपैकी एक म्हणजे कोल्हापूरच्या बिंदू चौकात उभारलेला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जगातील पहिला पुतळा. विशेष बाब म्हणजे हा पुतळा डॉ. आंबेडकर हयात असताना ९ डिसेंबर १९५० रोजी अनावरण करण्यात आला होता. प्रसिद्ध शिल्पकार बाळ चव्हाण यांनी तयार केलेला हा पुतळा तत्कालीन नगराध्यक्ष द.मा. साळोखे यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा प्रतिमा समितीकडून नगरपालिकेस करवीर जनतेच्यावतीने तो प्रदान करण्यात आला. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने आणि कार्याने बागल प्रभावित झाले होते फुले, आंबेडकरांपासून तरुणांना या शाहूनगरीत सतत स्फूर्ती मिळाली पाहिजे, हा त्यांचा उद्देश होता. यासाठी त्यांनी बिंदू चौकात महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ब्राँझचे पुतळे करून घेतले आणि ९ डिसेंबर १९५० ला त्यांचे हजारो लोकांच्या उपस्थितीत अनावरण केले. बिंदू चौकाच्या डाव्या-उजव्या बाजूच्या लोकांतून भाईजींनी दोन सामान्य माणसांना हाताला धरून नेले आणि त्यांच्या हस्ते या पुतळ्यांचे अनावरण केले गेले होते. आज देशात सर्वाधिक पुतळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आहेत, मात्र या पुतळ्याचे ऐतिहासिक महत्त्व आहे. सर्व बहुजनांसह आंबेडकरवाद्यांसाठी बिंदू चौक हे आदराचे आणि महत्त्वपूर्ण ठिकाण आहे. पुतळा उभारल्यानंतर, एकदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर कोल्हापूर दौऱ्यावर आले असता त्यांनी या आपल्या स्वतःच्या पुतळ्याला भेट दिल्याची आठवण मागच्या पिढीतील लोक सांगतात. ऐतिहासिक कार्यामागे होते एक सत्यशोधक विचारधारेने प्रेरित, अत्यंत प्रबुद्ध आणि सामाजिक जाण असलेले नेतृत्व, भाई माधवराव बागल. ही घटना फक्त पुतळा उभारण्याची नसून ती महाराष्ट्रातील सामाजिक समतेच्या चळवळीचा मैलाचा दगड ठरली. या घटनेचा इतिहास समजून घेताना आपणास महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या त्रिसूत्रीचा विचार करावा लागतो. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून जातीभेदाविरुद्ध आणि अंधश्रद्धेविरुद्ध लढा दिला. त्यांच्यानंतर कोल्हापूरचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे पहिले प्रगतीशील शासक ठरले, ज्यांनी शिक्षण, आरक्षण आणि सामाजिक न्याय यांचा पाया घातला. त्यांच्या कार्याचा प्रभाव कोल्हापूरच्या समाजमनावर खोलवर होता. आणि त्याच या पार्श्वभूमीवर पुढे आलेले एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणजे भाई माधवराव बागल. हे महान चित्रकारसुध्दा होते. कलाकार किती संवेदनशिल असतो हे यातून दिसून येते. बाबासाहेब स्वत: व्हायोलिन वाजवत, चित्रे रेखाटत अशा व्यक्तिमत्वाचा एका कलाकाराने केलेला हा सन्मान होता. भाई बागल हे फक्त सत्यशोधकच नव्हते, तर शाहू महाराजांच्या धोरणांचे खरे वारसदार होते. ते पत्रकार, साहित्यिक आणि एक प्रभावी समाजसुधारक होते. त्यांनी 'ज्ञानोदय' आणि 'सत्यशोधक' सारख्या मासिकांतून शोषित, दलित आणि बहुजन समाजाच्या आवाजाला धार दिली. त्यांच्या लेखणीत क्रांती होती आणि कृतीत परिवर्तन. १९५० च्या दशकात कोल्हापूरमध्येही अस्पृश्यता, जातिभेद आणि सामाजिक विषमता पसरलेली होती. अनेक समाजघटकांमध्ये शिक्षणाचा अभाव, रोजगाराच्या संधींचा तुटवडा आणि सामाजिक प्रतिष्ठेची कमतरता होती. अशा वेळी भाई बागल यांनी बाबासाहेब आंबेडकरांचे विचार कोल्हापूरच्या जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी एक वेगळेच पाऊल उचलले, बाबासाहेबांचा पुतळा बिंदू चौकात उभारण्याचा. ९ डिसेंबर १९५० रोजी, मोठ्या आदरभावनेने आणि जनतेच्या उपस्थितीत या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. विशेष म्हणजे बाबासाहेब आंबेडकर एकदा स्वतः कोल्हापुरात आले आणि त्यांनी पुतळा पाहून भाई बागल यांच्या कार्याचे कौतुक केले. तो क्षण केवळ भावनिक नव्हता, तर कोल्हापूरच्या प्रगल्भ सामाजिक जाणीवेचा पुरावा होता. भाई बागल यांचे हे कार्य म्हणजे सामाजिक न्यायाच्या चळवळीला प्राणवायू देणारे ठरले. त्यांनी आंबेडकरांच्या विचारांचे समर्थन करताना कोल्हापूरच्या तरुण पिढीत नवचैतन्य निर्माण केले. त्या पुतळ्याच्या माध्यमातून त्यांनी समतेचा, बंधुतेचा आणि स्वाभिमानाचा संदेश दिला.



भैरवनाथ वाकळे
संपादक, रयत समाचार
९४०५४०१८००
ग्यानबाची मेख

आजही बिंदू चौकातील हा पुतळा केवळ एक वास्तू नाही, तर सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याचे प्रेरणास्थान आहे. दरवर्षी लाखो लोक या पवित्र स्थळी येतात आणि बाबासाहेबांना अभिवादन करतात. कोल्हापूरची ही माती राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी समृद्ध झाली असून, भाई बागल यांच्या कृतीने ती अभिमानाने इतिहासात नोंदली गेली आहे. त्यांना माहित होते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर इतके महान आहेत की त्यांची प्रेरणा येत्या पिढ्यांना त्यांच्या हयातीत दिली पाहिजे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपेक्षा कोणीच मोठे नाही. या घटनेची आठवण म्हणजे केवळ गौरवशाली भूतकाळाची नव्हे, तर आजच्या पिढीला सामाजिक भान देणारी आणि कृतीत परिवर्तन घडवणारी प्रेरणा आहे, हे सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांनी ध्यानात घेतले पाहिजे.



महानगरपालिका प्रशासकीय काळातील कचरा संकलन 'अ' व्यवस्थेची खरी परिस्थिती : अहिल्यानगर जिल्हा व सत्र न्यायालयाच्या पार्किंगमधील कचऱ्याचे ढिगारे सोमवारी ता.७ एप्रिल २०२५ दुपारी ३ वाजल्याचे दृष्य.
(छायाचित्र : एक्स्प्रेस फोटो, अहमदनगर)

## भगवान महावीर जयंती महोत्सव भव्य आयोजन

### सकल जैन समाज, पाथर्डी जैन श्रावक संघ, महावीर युवा मंच, श्री तिलोक जैन परिवार यांची संकल्पना

**राजेंद्र देवढे । पाथर्डी**




पाथर्डी तालुका सकल जैन समाज, पाथर्डी जैन श्रावक संघ, महावीर युवा मंच, श्री तिलोक जैन परिवार यांच्या संकल्पनेतून गेल्या अनेक वर्षांपासून पाथर्डी शहरात विविध उपक्रमांद्वारे भगवान महावीर स्वामी जयंती अर्थात महावीर जन्म कल्याणक मोठ्या उत्साहाने आणि श्रद्धेने साजरा करण्यात येतो. या वर्षी २४ वे तीर्थंकर भगवान महावीर स्वामी यांच्या जन्म कल्याण महोत्सवानिमित्त तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी शहरातील जैन स्थानकात आज बुधवारी सकाळी ७.४५ ते ९.०० वाजेपर्यंत नवकार महामंत्राचा जाप करण्यात आला. यावेळी जगभरातील १०८ देशांसह भारतातील प्रमुख शहरांतील जैन बांधवांशी संवाद साधण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. या तालुकास्तरीय जयंती सोहळ्यास १० एप्रिल २०२५ रोजी प्रारंभ होणार असून गुरुवारी सकाळी भगवान महावीरांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर प्रबोधनकार उद्धव महाराज चन्ने यांचे व्याख्यान व हेमंत गुगळे यांच्या वतीने महाप्रसाद दिला जाणार आहे. शुक्रवारी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये सुविधी बहु मंडळ, प्रतिभा बहु मंडळ, आनंद पाठशाळा यांचा सहभाग असणार आहे. यावेळी धार्मिक गीते, नाटिका व तपस्वीचा सन्मान आदी कार्यक्रम होणार आहेत. तर शनिवारी मुंबई येथील सुप्रसिद्ध संगीतकार सागरभाई शहा यांची भक्ती संध्या होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन पाथर्डी जैन श्रावक संघ, महावीर युवा मंच, श्री तिलोक जैन परीवार, बहु मंडळ, कन्या मंडळ, जैन युथ फेडरेशन यांनी हाती घेतले असून सर्व समाजबांधवांना या सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या जयंती महोत्सवाची सुरुवात १० एप्रिल रोजी सकाळी ८:३० वाजता भव्य शोभायात्रेने होणार आहे. ही शोभायात्रा पाथर्डी शहरातील प्रमुख मार्गावरून काढली जाणार असून, त्यानंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात होईल.

या सोहळ्यासाठी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनेक नामवंत व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमातून जैन समाजाच्या परंपरा आणि संस्कृतीचे दर्शन घडविण्यासोबतच सामाजिक एकता आणि बंधुभावाचे प्रतीक म्हणून हा उत्सव साजरा होणार आहे. श्रावक संघाचे अध्यक्ष सुभाष चोरडिया, सचिव सुरेश गुगळे, महावीर युवा मंचचे सुनिल गुगळे, संतोष पटवा, संजय सेटीया, मनोज कटारिया, सतिश गुगळे, सुनील गांधी, राजेंद्र गुगळे, आनंद चोरडिया, हेमंत गुगळे आदींनी या महोत्सवात सहभागी होऊन भगवान महावीर स्वामींच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार करण्याचे आवाहन केले आहे.

# तरुण पिढीने व्यसनांपासून बाजूला जाऊन संतांचे विचार अंगीकारावे - हभप श्रीराम मचे



**अहमदनगर । प्रतिनिधी**

संत तुकाराम महाराज म्हणतात की, आपल्याला आवडणारी भक्ती न करता देवाला आवडणारी भक्ती करा. समाजामध्ये अंधश्रद्धेच्या माध्यमातून देवाची भक्ती केली जाते. ती भक्ती तुकोबारायांना मान्य नाही, त्यांना आवडणारी शुद्ध भक्ती करा. अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रम हा मुदगल परिवारापुरता मर्यादित नसून आजच्या तरुण पिढीसाठी मार्गदर्शक आहे. तरुण पिढीने व्यसनांपासून बाजूला जाऊन संतांचे विचार अंगीकारावे, जेणेकरून चांगली पिढी निर्माण होईल.

आपले धार्मिक उत्सव एकत्र येऊन मोठ्या उत्साहात साजरी करायचे आहे, या माध्यमातून देवाविषयी, धर्माविषयी आदरभाव जागृत होतो. माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल यांच्या वतीने ३३ वर्ष सुरू असलेले अखंड हरिनाम सप्ताहाचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन हभप श्रीराम महाराज मचे यांनी केले. नालेगाव गाडगीळ पटांगण येथे हनुमान व्यायाम शाळा यांच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह मध्ये हभप श्रीराम महाराज मचे यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. यावेळी माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल, सुनिता मुदगल आदींसह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हभप श्रीराम महाराज मचे पुढे म्हणाले की, भक्तीच्या जगामध्ये दुसऱ्याने भक्ती केली म्हणून आपण ती करू नका! जगाच्या मालकाला आवडेल अशीच भक्ती करा.

संकटाच्या काळात आपल्या सर्वांना देव आठवतो, जसा कोरोनाच्या काळामध्ये देव आठवला होता. आपण चांगली भक्ती केल्यास देवाला सांगण्याची गरज भासत नाही पूर्वी धर्मसत्ता आणि राजसत्ता एकत्र नांदत होती. संत तुकाराम महाराज यांच्या धर्म कार्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पाठिंबा होता, तुकाराम महाराज यांची साधेपणाची राहणी असायची, तुकाराम महाराज धर्माचा प्रचार करत असत तेव्हा मात्र त्यांच्या घरी खायला अन्न नसायचे, ही बाब छत्रपती शिवाजी महाराज यांना कळल्यानंतर त्यांनी तातडीने स्वर्णहिरे, माणिकमोती, घोडे असा लवाजावा संत तुकाराम महाराज यांच्याकडे पाठविला मात्र महाराज म्हणाले हे सर्व माझ्यापुढे कवडी मोलाचे आहे. याच्यामुळे माझ्यात आणि देवात अंतर पडेल असे उद्गार काढले यामधून तुकाराम महाराज यांनी भक्तीसाठी त्याग केला आणि देवासाठी भक्ती केली असे उद्गार हभप श्रीराम महाराज मचे यांनी काढले.



# पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीसाठी जागरूक असणे गरजेचे- उपप्राचार्य कसोटे

## अहमदनगर महाविद्यालयात पालक - शिक्षक सभा संपन्न

**अहमदनगर । प्रतिनिधी**

डॉ. बी.पी. हिवाळे शिक्षण संस्थेचे अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर कनिष्ठ महाविद्यालयात पालक शिक्षक सभा उत्साहात संपन्न झाली. या सभेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी व त्यांच्या समग्र विकासासाठी शिक्षक व पालकांचा सक्रिय सहभाग आणि योगदान यावर चर्चा करण्यात आली. ही पालक सभा विज्ञान, वाणिज्य व कला अशा दोन टप्प्यात घेण्यात आली. या सभेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.उपप्राचार्य प्रतुल कसोटे यांनी पालकांशी संवाद साधताना पालकांनी आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीसाठी जागरूक असणे गरजेचे असून सर्व प्रथम पालकांनी आपल्या मुलांशी मैत्री करून त्यांच्याशी रोज संवाद साधावा, तसेच मुलांना अभ्यासाबरोबर क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम यामध्ये सहभाग घेण्यास प्रोत्साहन द्यावे. प्रत्येकाच्या आयुष्यात विद्यार्थी दशेतील जीवन अत्यंत महत्वाचे असते. विद्यार्थ्यांवर योग्य संस्कार व योग्य शिक्षण देण्याचे काम पालक व शिक्षकाचे असते, असे ते म्हणाले.विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्याचा पूर्णपणे प्रयत्न करता यावा, या उद्देशाने पालक सभेचे अहमदनगर महाविद्यालयात आयोजन करण्यात आले होते. तसेच यावेळी विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याच्या पद्धती, पेपर लिहिण्याचे कौशल्य, वर्गातील नियमितता, आदी बाबतचे महत्व सांगण्यात आले. वर्षभरात विद्यार्थ्याच्या घेण्यात येणाऱ्या सराव परीक्षा, प्रात्यक्षिके, प्रकल्प, तोंडी परीक्षा, स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी, प्रवेश परीक्षा मार्गदर्शन याविषयीची माहिती विद्यार्थी व पालकांना देण्यात आली. याप्रसंगी पर्यवेक्षिका उज्वला गायकवाड, उकिरडे , घुमरे , कसबेकर, बार्नबस, कांबळे, शिंदे, गायकवाड , स्वामी , तुपे , नाथ, निघोजकर या विषय शिक्षकांनी ही पालकांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. या सभेचे सूत्रसंचालन घुमरे, रिबेका थॉमस व ममता पाटोळे यांनी केले. तर विजय मोरे यांनी आभार प्रदर्शन केले. या सभेच्या यशस्वितेकरिता सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# ऐन उन्हाळ्यात पाण्याअभावी नागरिकांचे हाल

**अहमदनगर । प्रतिनिधी**

बोल्हेगाव परिसरातील राघवेंद्र स्वामी रोड शंभूराजे चौक येथील आदीकैलास सोसायटीला गेल्या १५ दिवसांपासून पाणीपुरवठा झालेला नसल्याने तेथील सुमारे १५० सदनिकांमधील रहिवाशांचे अतोनात हाल सुरू आहेत. याबाबत महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आलेले असून सोसायटीचा पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत न झाल्यास महापालिका कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा सोसायटीतील नागरिकांनी निवेदनाद्वारे दिला आहे.



**स्पिडब्रेकरमुळे निखळले चाक** छत्रपती संभाजीनगर रोडवरील बीटीआर गेटजवळ चुकीच्या पद्धतीने टाकलेले गतिरोधक अपघातास कारणीभूत ठरत आहे. काल दुपारी एक ट्रक यावरून जाताना मागील चाक अक्षरशः निखळून ट्रक पलटी होता होता वाचला. (छाया- विजय मते)

# ४५ वी कुमार राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी जिल्हा निवड चाचणी

## जिल्ह्यातील युवा कुस्तीपटूंना सहभागी होण्याचे आवाहन



**नगरतालुका । प्रतिनिधी**

४५ वी कुमार राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा सन २०२४-२५ साठी नगर तालुका तालिम सेवा संघाच्या वतीने जिल्हा निवड चाचणीचे शुक्रवारी ११ एप्रिल रोजी निमगाव वाघा येथे आयोजन करण्यात आले आहे. या निवड चाचणीत जिल्ह्यातील युवा कुस्तीपटूंना सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा तालिम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे व नगर तालुका तालिम सेवा संघाचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी केले. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने पै. पंकज हारपुडे व पै. महेश मोहोळ मित्र परिवाराच्या वतीने ४५ वी कुमार राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दि. १२ एप्रिल ते १३ एप्रिल दरम्यान कै. मामासाहेब मोहोळ कुस्ती संकुल कात्रज पुणे या ठिकाणी होणार आहे. या स्पर्धेसाठी जिल्ह्याचा संघ पाठविला जाणार असून, त्याची निवड या निवड चाचणीद्वारे होणार आहे. शुक्रवारी सकाळी ९ ते १० कुस्तीपटूंचे वजन होणार आहे. तर ११ वाजता कुस्तीला प्रारंभ होणार असून, वजनगट ४५, ४८, ५१, ५५, ६०, ६५, ७१, ८०, ९२ व ११० किलो पर्यंन्तच्या गटात ही निवड चाचणी स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत २००७ ते २००८ जन्मलेल्या खेळाडूंना सहभागी होता येणार आहे. ही कुमार राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा सन २०२४ वर्षातील आहे. स्पर्धेला येताना आधारकार्ड, जन्म प्रमाणपत्र, बोनाफाईड, दहावी किंवा बारावीचे बोर्डाचे प्रमाणपत्राची सत्यपत्र आणि प्रत्येकी एक झेरॉक्स आणणे अनिवार्य असल्याचे म्हंटले आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पै. युवराज पठारे, पै. नामदेव लंगोटे, पै. विलास चव्हाण, पै. बाळासाहेब भापकर, पै. संदिप डोंगरे, पै. मोहर हिरनवाळे, पै. प्रताप चिंधे, पै. ऋषीकेश धांडे, पै. सुनिल भिंगारे, पै. विक्रम बारवकर, पै. संदीप बारगुजे, पै. बबलू धुमाळ, पै. पप्पू शिरसाठ आदी परिश्रम घेत आहे. अधिक माहितीसाठी पै.नाना डोंगरे मो.नं. ९२२६७३५३४६ यांच्याशी संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

# कॅन्टोन्मेंटला उपोषणाला बसतोस काय, तक्रार करतोस काय, म्हणत दोन व्यक्तींकडून मारहाण



**भिंगार । प्रतिनिधी**

येथील सामाजिक कार्यकर्ते विकास चव्हाण यांना काल रात्री पावणे अकराच्या सुमारास कॅन्टोन्मेंट हॉस्पिटलसमोरील निर्जन रस्त्यावर गाडी आडवी घालून मारहाण करण्यात आली.

त्यावेळी मारहाण करणाऱ्या व्यक्ती म्हणत होत्या, कॅन्टोन्मेंटला उपोषणाला बसतोस काय, डायरेक्टरकडे आमची तक्रार करतोस काय. त्यावेळी त्यांच्याकडे नानचाकू हे ब्रूसलीचेन हत्यार होते, अशी माहिती चव्हाण यांनी दिली.




# प्रज्ञाशोध परीक्षेत जय बजरंग विद्यालयाचे १२ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**अहमदनगर । प्रतिनिधी**

राज्यस्तरीय लक्षवेध प्रज्ञाशोध परीक्षेत विद्यालयाने परीक्षेस बसविलेल्या, आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग प्राथमिक विद्यालय,पाईपलाईन रोड,अहिल्यानगरचे १ ली ते ७ वी पर्यंतचे १२ विद्यार्थी राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत चमकले दर्शन गणेश घुले याने इ २ री १५० पैकी १४४ गुण मिळवून राज्यात चौथा क्रमांक पटकावला तर आराध्या कैलास मेहेत्रे इ.२ री हिने१५० पैकी १४२ गुण मिळवून राज्यात पाचवा क्रमांक पटकावला. ईशान दीपक घुले इ.१ ली १५० पैकी १३४ गुण मिळवून जिल्हा यादीत दुसरा क्रमांक पटकावला. तर आयुश्री दीपक ढवळशंख इ २ री हिने १५० पैकी गुण मिळवून जिल्हा यादी तिसरा क्रमांक पटकावला .शिवन्या गणेश कुसाळकर इ २ री १५० पैकी १२६ गुण मिळवून जिल्हा यादीत आठवा क्रमांक पटकावला.अंजली रवींद्र आव्हाड १ ली १५०पैकी १२० गुण मिळवून नववा क्रमांक पटकावला. सिद्धेश अमोल क्षीरसागर इ.५ वी ३०० पैकी २५२ गुण मिळवून जिल्हा यादीत बारावा क्रमांक पटकावला.अभिषेक प्रभाशंकर कुशवाह इ ६ वी ३०० पैकी २५० गुण मिळवून जिल्हा यादीत तेरावा क्रमांक पटकावला. स्वरा रवींद्र आव्हाड इ १ ली हिने जिल्हा यादीत पंधरावा क्रमांक पटकावला.प्रथमेश अशोक वारे १ ली १५० पैकी १०८ गुण मिळवून जिल्हा यादीत सोळावा क्रमांक पटकावला. श्रावणी संतोष पानकडे इ.४ थी ३०९ पैकी २५० जिल्हा यादीत एकोणिसावा क्रमांक पटकावला.श्रीलेखा गणेश आडसरे इ.४ थी ३००पैकी २३० गुण मिळवून जिल्हा यादीत २९वा क्रमांक पटकावला. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया,सहसचिव उमेश गांधी,व्यवस्थापक आशुतोष घाणेकर यांनी अभिनंदन केले.तर विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर यांनी सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षकांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

रयत समाचार **Classified** छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.


मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# जैव अर्थव्यवस्थेची भुमिका ग्रामिण विकासासाठी महत्वपुर्ण- उज्वला बावके-कोळसे

## संजीवनी युनिव्हर्सिटी व वरीष्ठ महाविद्यालय आयोजीत आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

**कोपरगाव । किसन पवार**

ग्रामिण विकासासाठी जैव अर्थव्यवस्थेची (बायो इकॉनॉमी) भुमिका महत्वपूर्ण ठरेल. भारताची जैव अर्थव्यवस्था २०३० पर्यंत ३०० अब्ज डॉलर्स पर्यंत जाईल. त्यासाठी भारत सरकारचे बायो-ईथ्री धोरण महत्वपुर्ण ठरेल. संजीवनी जागतिक दर्जाचे ज्ञान देत असुन तरूणांनी सरकारी योजनांचा लाभ घेवुन ग्रामिण विकासाला हातभार लावावा.

या परीषदेच्या माध्यमातुन बायोटेक्नॉलॉजी क्षेत्रातील तज्ञांच्या मार्गदर्शनातून नाविण्यपुर्ण कल्पना समोर येतिल, असे प्रतिपादन नाशिक महसुल विभागाच्या डेप्युटी कमिशनर उज्वला बावके-कोळसे यांनी केले. मायक्रोबायोलॉजिस्टस् सोसायटी, इंडियाच्या सहकार्याने संजिवनी युनिव्हर्सिटी व सिनिअर कॉलेजने




आयोजीत केलेल्या 'इनोव्हेशनस् इन बायोटेक्नालॉजी रिसर्च फॉर सस्टेनेबल बायोरिसोर्सेस अँड बायोइकॉनॉमीः चॅलेंजेस अँड प्रक्टिसेस' या विषयावरील तिसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून बावके बोलत होत्या.

यावेळी संजीवनी युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष अमित कोल्हे, मायक्रोबायोलॉजी सोसायटी, इंडियाचे प्रेसिडेंट डॉ. ए.एम. देशमुख, इंडियन नॅशनल सायन्स अकॅडमी, नवी दिल्लीचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर डॉ. ब्रजेश पांडे, रिलायंस लाईफ सायन्स, मुंबईचे व्हाईस प्रेसिडेंट डॉ. आश्विन गजरा, व्हाईस चांसलर डॉ. ए. जी. ठाकुर, प्राचार्य डॉ. एस.बी. दहिकर, थायलंड मधिल प्रिन्स ऑफ सोंग्क्ला युनिव्हर्सिटीचे प्रा.सुट्टावॅट बेंजाकुल, रशिया मधिल उरल फेडरल युनिव्हर्सिटीच्या प्रा. एलेना कोवालेवा, आघरकर रिसर्च इन्स्टिटयूट , पुणेचे डॉ. कमलेश जांगिड, पंजाब मधिल नॅशनल आगरी फुड बायोटेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट्सचे डॉ.शिवराज निळे, रसिया मधिल सरतोव स्टेट फेडरल युनिव्हर्सिटीचे डॉ. तात्याना वाय. कलयुता, कंबोडिया मधिल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नालॉजीचे प्रा. रिझमे टॅन, पुण्याचे अविनाश साळुंके, आरोग्य मंत्रालय, नवी दिल्लीचे डॉ. अजय कांबळे, गांधीनगर युनिव्हर्सिटी, गुजरातचे डॉ. डी. के. आचार्य, डॉ. आर.एस.शेडगे , परिषदेच्या आयोजन सचिव डॉ. सरीता भुतडा, आदी व्यासपीठावर उपस्थित होते. या परीषदेत संशोधक, प्राद्यापक, विद्यार्थी, उद्योजक, पी.एचडी स्कॉलर, अशा ७४७ जणांनी सहभाग नोंदविला. यावेळी शोधनिबंध स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच बायोटेक्नॉलॉजी क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या व्यक्तिंना पुरस्कार देवुन सन्माणित करण्यात आले. प्रारंभी प्राचार्य डॉ. दहिकर यांनी सर्वांचे स्वागत करून परिषदेचे उद्दिष्ट स्पष्ट केले. डॉ. ठाकुर यांनीही सर्वांचे स्वागत करून संजीवनी युनिव्हर्सिटी व संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित विविध संस्थांची माहिती दिली. अमित कोल्हे म्हणाले की कोपरगांव सारख्या ठिकाणी बायोटेक्नॉलॉजी विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी परदेशातुन तज्ञ आले आहेत, ही सर्वांच्या दृष्टीने मोठी उपलब्धी आहे. यातुन संजीवनी राष्ट्र उभारणीसाठी प्रयत्न करीत आहे, हे स्पष्ट होते. डॉ. पांडे म्हणाले की येथुन पुढील काळात जैवतंत्रज्ञानात एआय म्हणजे आर्टिफिशियल इंटिलीजंसची (कृत्रिम बुध्दिमत्ता) भुमिका महत्वपुर्ण असणार आहे. यामुळे जैव उत्पादनांचा खर्च कमी होईल व ती सर्वसामान्यांनाही परवडेल.

डॉ. गजरा म्हणाले की भारत जैव उत्पादनामध्ये महत्वाची भुमिका साकारत आहे.यामध्ये बायोएन्झाईन, बायोसिमीलर क्षेत्रामध्ये संशोधकांसाठी जागतिक पातळीवर मोठ्या संधी उपलब्ध आहे. डॉ. देशमुख म्हणाले की संजीवनी ग्रामिण भागात असुनही नवतरूणांना आधुनिक ज्ञान देण्यात अग्रभागी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बायो इर्थी हे विधायक संमत करून तरूणांसाठी मोठी संधी निर्माण केली आहे. तरूणांनी या आधारे बायेटेक्नॉलॉजी व मायक्रोबायोलॉजीच्या माध्यमातुन रोजगार निर्माण करावा. यासाठी मायक्रोबायोलॉजी सोसायटी आर्थिक मदतीसह सर्व मदत करायला तयार आहे.



# रयत ऑलिंपियाडमध्ये आविष्कार सोमवंशी यशस्वी

**श्रीगोंदा । सचिन झगडे**

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विद्यालयातील विद्यार्थी अविष्कार विकास सोमवंशी याने रयत ऑलिंपियाड या स्पर्धेमध्ये यश संपादन केले. रयत शिक्षण संस्थेच्या राज्य स्तरावर कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत रयत ऑलिंपियाड स्पर्धा परीक्षेचे आयोजन केले जाते.

ही गणित आणि विज्ञान विषयावरील अत्यंत अवघड परीक्षा मानली जाते. या परीक्षेमध्ये महादजी शिंदे विद्यालयाचा विद्यार्थी अविष्कार सोमवंशी याने उत्कृष्ट यश संपादन केले . त्याला परीक्षा प्रमुख शिवाजी थिटे,कर्मवीर विद्याप्रबोधिनी प्रमुख अभिमान सोनवणे, विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, उपप्राचार्य शहाजी एकाड, पर्यवेक्षक सुनिता काकडे यांचे मार्गदर्शन मिळाले.

रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बाबासाहेब भोस, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुल जगताप , माजी आमदार बबनराव पाचपुते , आमदार विक्रमसिंह पाचपुते , उत्तर विभागाचे विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे तसेच स्कूल कमिटी पालक-शिक्षक संघ या सर्वांनी आविष्कार चे अभिनंदन केले.

# वैको बॉयलर रिसर्च अँड ब्रिडींग फार्मच्या अनाधिकृत बांधकामांवर कारवाईचा आदेश

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्री. वैको बॉयलर रिसर्च अँड ब्रिडींग फार्म प्रा.लि. निंबवी यांचे अनाधिकृत बांधकाम व व्यवसाय तात्काळ बंद करण्याची ग्रामस्थांचे निवेदनासंदर्भात ता. ०९ एप्रिल २०२५ रोजी अर्जदार व ग्रामस्थ निंबवी तसेच श्री. वेंको बॉयलर रिसर्च अँड ब्रिडींग फार्म प्रा.लि. यांचे प्रतिनिधी व विधिज्ञ तसेच संबंधीत विभागाचे अधिकारी यांचेमध्ये सुनावणी घेण्यात आली असता सुनावणी दरम्यान पुढील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत. सदर तक्रार ही श्री. वैको बॉयलर रिसर्च अँड ब्रिडींग फार्म प्रा.लि. निंबवी यांच्या जुन्या बांधकामाबाबत नसुन आज रोजी सुरु असलेल्या नविन बांधकामाबाबत आहे.



नव्याने सुरु असलेले बांधकामास ग्रामपंचायतीची बांधकाम परवानगी घेतली नसल्याचे संबंधीत ग्राम पंचायत अधिकारी निंबवी यांनी निदर्शनास आणुन दिल्याने सदर बांधकामास ग्रामपंचायतीची बांधकाम परवानगी नसल्याने याकामी ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार ग्रामपंचायत स्तरावरुन नियोमोचित कार्यवाही करावी व संबंधीत अर्जदार व ग्रामस्थ यांना आपलेस्तरावरुन केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती देण्यात यावी असे ग्रामपंचायत, गट विकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा यांना कळविण्यात आलेले आहे. उक्त नमुद कंपनीमार्फत मौजे निंबवी येथे आज रोजी सुरु असलेल्या नविन बांधकामाबाबत आपले विभागाची परवानगी घेतली अगर कसे याबाबत खात्री करून पुढील नियोमोचित कार्यवाही करण्यात यावी.याबाबत उप प्रादेशीक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ अहिल्यानगर, तालुका आरोग्य अधिकारी/पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा यांना कळविण्यात आले आहे.

# सिंधी समाज महिला मंडळ अध्यक्षपदी कशिश शर्मा

**कोपरगाव । किसन पवार**

सिंधी समाजाचे इष्टदेवता भगवान झुलेलाल अर्थातच वरुणदेव यांची जयंती कोपरगाव शहरात नुकतीच मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. सदर प्रसंगी कोपरगाव शहर सिंधी समाज महिला मंडळाची नुतन कार्यकारणी पुढील दोन वर्षांसाठी जाहिर करण्यात आली. यात अध्यक्षपदी सर्वानुमते कशिश विकी शर्मा यांची निवड करण्यात आली.



तसेच उपाध्यक्षपदी वर्षा दिपक आर्य, सचिव गुंजन राम आर्य, सहसचिव कीर्ति शाम कृष्णाणी, खजिनदार दिव्या गोपी शर्मा, सह खजिनदार आंचल सुंदर आर्य यांची निवड करण्यात आली. यावेळी मावळत्या अध्यक्षा सिमरन खुबाणी यांनी त्यांच्या कारकिर्दीत केलेल्या कार्याचा आढावा दिला.

तर महिला मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा शालिनी खुबाणी यांनी नुतन कार्यकारणीला पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. नुतन अध्यक्ष कशिश शर्मा यांनी येणाऱ्या काळात अनेक समाजोपयोगी कार्यक्रम घेण्यात येतील असा मानस व्यक्त केला.

# दूध उत्पादकांच्या अनुदानासाठी आ.ओगले रस्त्यावर उतरणार

## दूध उत्पादकांचे अनुदान तातडीने खात्यावर जमा न केल्यास आंदोलन

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

श्रीरामपूर- राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत ओगले यांनी दिला आहे. ओगले म्हणाले, अनेक संकटांना तोंड देऊन मोठ्या कसोटीने दूध उत्पादक हा आपला व्यवसाय करत आहे सरकारने जाहीर केलेले अनुदान अद्याप पावतो जमा केलेले नाही एकीकडे मागील काही वर्षात दुधाचे कमी दरांमुळे दूध उत्पादक अडचणीत होता आणि आता दुसरीकडे जमा न झालेले अनुदान अशा अनेक संकटांना दूध उत्पादक सध्या सामोरे जात आहे.



शेतकऱ्यांचा मुख्य जोडधंदा म्हणून दूध व्यवसायाकडे पाहिले जाते जास्तीत जास्त उत्पादक हे शेतकरी बांधव आहे. एकीकडे न केलेली कर्जमाफी, पिकांना न दिलेला हमीभाव आणि आता दूध उत्पादकांचे देखील अनुदान सरकारने रोखले अशा चहुबाजूने बळीराजा अडचणींचा सामना करत आहे तरी तातडीने दूध उत्पादकांचे थकलेले अनुदान त्यांच्या खात्यावर वर्ग करा अन्यथा रस्त्यावर उतरण्याचा इशारा आमदार हेमंत ओगले यांनी दिला आहे.आमदार हेमंत ओगले यांनी शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळावा तसेच दूध उत्पादकांना वाचविण्यासाठी जास्तीत जास्त अनुदान द्यावे अशी मागणी राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनामध्ये सरकारकडे केली होती.

# साईबाबा संस्थानास ४ कोटी देणगी

**शिर्डी । शफीक बागवान**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने आयोजीत केलेला श्रीरामनवमी उत्सव कालावधीत ४ कोटी २६ लाख ७ हजार १८२ इतकी देणगी प्राप्त झाली असल्याची माहिती संस्थानचे उप मुख्यकार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांनी दिली. यामध्ये रोख स्वरुपात रुपये ०१ कोटी ६७ लाख ८९ हजार ०७८ दक्षिणा पेटीत देणगी प्राप्त झाली असून, देणगी काऊंटरवर ७९ लाख ३८ हजार ८३० रुपये, पी.आर.ओ. सशुल्क पास देणगी ४७ लाख १६ हजार ८००, ऑनलाईन चेक डीडी, मनिऑर्डर, डेबीट क्रेडीट कार्ड, युपीआय याद्वारे ०१ कोटी २४ लाख १५ हजार २१४, सोने ८३.३०० ग्रॅम रक्कम रुपये ०६ लाख १५ हजार ७८२ व चांदी २०३०.४०० ग्रॅम रक्कम रुपये ०१ लाख, ३१ हजार ४७८ यांचा समावेश आहे. श्रीरामनवमी उत्सव कालावधीत साधारणतः अडीच लाखाहून अधिक साईभक्तांनी साईदर्शनाचा लाभ घेतला, उत्सव कालावधीमध्ये श्री साईप्रसादालयाद्वारे सुमारे ०१ लाख ६१ हजार ५२९ साईभक्तांनी प्रसाद भोजनाचा लाभ घेतला तर दर्शन रांगेत ०१ लाख ७६ हजार २०० साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद पाकीटांचे वाटप करण्यात आले. या कालावधीत ३ लाख ६३ हजार ०७४ लाडूप्रसाद पाकिटांची विक्री झाली असून त्या माध्यमातून ७२ लाख ६१ हजार ४८० रूपये प्राप्त झाले. उत्सव काळात हजारो साईभक्तांनी संस्थानच्या साईप्रसाद निवासस्थान, साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती निवासस्थान, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा आदी ठिकाणांबरोबर अतिरिक्त निवास व्यवस्थेकरीता उभारण्यात आलेल्या मंडपात निवास व्यवस्थेचा लाभ घेतला. तसेच साईधर्मशाळा येथे विविध भागातून आलेल्या पालख्यांमधील पदयात्री साईभक्तांनी निवास व्यवस्थेचा लाभ घेतला असे दराडे यांनी सांगितले.

# मंथन परिक्षेत श्रीगोंदा माध्यमिक विद्यालयाचे घवघवीत यश

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

राज्यस्तरीय मंथन सामान्य ज्ञान परीक्षा २०२५ साठी झालेल्या परीक्षेत श्रीगोंदा माध्यमिक विद्यालयाचे (ज्ञानदीप) इयत्ता: ६वी तील एकूण १८ विदयार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १० विदयार्थी उत्तीर्ण होऊन त्यांनी परीक्षेत यश संपादन केले. तसेच इयत्ता सातवीतील एकूण १७ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट होते त्यातील ७ विद्यार्थी उत्कृष्ठ गुण मिळवून उत्तीर्ण झाले. इयत्ता ६ वी तील पूर्वी संजय गारुडकर -२१२गुण ग्रेड, पवार प्रणव दत्तात्रय -२०८गुण, साळुंके आरोही सचिन -१४६ गुण, पठारे मयूर अनिल -१४६ गुण,गोरे शिवराज सागर -१३८ गुण,सुपेकर वीर शरद -१३२गुण,स्वराज संदीप गांगर्डे-१३२ गुण,जाधव अथर्व युवराज -१३० गुण,कु. गारुडकर ईश्वरी राजेंद्र -१२४ गुण, कु. गायकवाड अनुष्का राजू -१२४ गुण,इयत्ता ७ वी तील शिंदे अवधूत रामदास -१८४ गुण (+) ग्रेड मिळवून वर्गात प्रथम ,कापरे कुणाल सतीश-१६८ गुण,रणसिंग आर्यन रवींद्र-१६४ गुण, खेतमाळीस संग्राम महेश-१६२ गुण,बिशुकर्मा कृष्णा भीमबहादूर -१४६ गुण, कामी गणेश जीतबहादूर-१४० गुण, खेतमाळीस वरद प्रमोद-१३४ गुण मिळवून यश संपादन केले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव राजेंद्र नागवडे, संस्थेच्या अध्यक्षा अनुराधा नागवडे, संस्थेचे इन्स्पेक्टर बी के लगड ,संस्थेचे ऑडिटर भापकर तसेच संस्थेचे मार्गदर्शक ठाणगे, विद्यालयाचे मुख्याध्यापक आनंदकर ,तसेच सर्व शिक्षक सेवक वृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले .

# अहिंसेचे प्रतीक भगवान महावीर

जैन धर्माचे चोविसावे तीर्थांकार अहिंसेचे मूर्तिमंत प्रतीक भगवान महावीर यांची आज जयंती. भगवान महावीर यांचा जन्म वैशाली राज्याच्या कुंडलपूर येथे इसवी सन पूर्व ५९९ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सिद्धार्थ तर आईचे नाव त्रिशला असे होते. त्यांच्या भावाचे नाव नंदिवर्धन तर बहिणीचे नाव सुदर्शना असे होते. त्यांचे बालपण राजेशाही थाटात गेले. भगवान महावीर आठ वर्षाचे असताना त्यांना शिक्षण आणि शस्त्र विद्येचे प्रशिक्षण घेण्यासाठी शाळेत पाठवण्यात आले. भगवान महावीरांचे कुटुंब जैनांचे तेविसावे तीर्थांकार भगवान पार्श्वनाथ यांचे अनुयायी होते. भगवान महावीर २८ वर्षाचे असतानाच त्यांच्या आईवडीलांचे निधन झाले त्यानंतर त्यांनी श्रामणी दीक्षा घेतली आहे. त्यानंतर काही दिवसांनी त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले. त्यांनी १२ वर्ष मौन पाळले. हटयोग्याप्रमाणे त्यांनी शरीराला कष्ट दिले. ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी जनकल्याणासाठी उपदेश देण्यास सुरुवात केली त्यासाठी त्यांनी त्याकाळी प्रचलित असणारी अर्धमागधी भाषेचा आधार घेतला. इंद्रिय व विषय वासनेचे सुख दुसऱ्याला दुःख देऊनच मिळवता येते असे त्यांचे मत होते त्यामुळेच त्यांनी जैन धर्माच्या अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह याबाबींमध्ये ब्राम्हचर्याचाही समावेश केला. त्याग, संयम, प्रेम, करुणा, शील व सदाचार हे त्यांच्या प्रवचनाचे सार होते. त्यांनी चतुर्वेध संघाची स्थापना करुन समता हेच जीवनाचे लक्ष असल्याचे सांगितले. देशात ठिकठिकाणी फिरून भगवान महावीरांनी या पवित्र संदेशाचा प्रसार केला. इसवी सन पूर्व ५२७ मध्ये बिहार मधील पावापुरी येथे वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांचे निर्वाण झाले. तो दिवस होता कार्तिक कृष्ण अमावस्येचा. भगवान महावीरांच्या जन्म आणि निर्वाण दिनादिवशी घराघरात दिवे लावले जातात. भगवान महावीर म्हणतात की, जाणते किंवा अजाणतेपणातून कोणाची हिंसा करणे योग्य नाही. याशिवाय दुसऱ्याच्या मार्फतही कोणाची हिंसा घडवून आणू नये कुठल्याही जीवांना मन, शरीर किंवा बोलण्याने दंडित करू नये. सर्वांच्या आत एकच आत्मा आहे. आपल्या प्रमाणेच प्रत्येक प्राण्यांना आपापले प्राण प्रिय आहे त्यामुळेच कोणत्याही प्राण्यांप्रति हिंसा करू नये. स्वतः हिंसा करणारा, दुसऱ्यांकडून हिंसा घडवून आणणारा व दुसऱ्याने केलेल्या हिंसेचे समर्थन करणारा स्वतःप्रति द्वेष वाढवत असतो असे तेच मत होते. कोणत्याही प्रकारची हिंसा न करणे हीच ज्ञानाची खरी परिभाषा आहे. अशाप्रकारे त्यांनी ज्ञानाची व्याख्या केली आहे. आपल्या आत्म्याविषयी असणारा भाव इतर प्राण्यांविषयी असू द्या. सर्व प्राणिमात्रांविषयी अहिंसेचा भाव राखा मन, वाणी आणि शरीराने कोणाचीही हिंसा न करणारा खरा संयमी म्हणून गणला जातो अशी संयमी माणसाची व्याख्या त्यांनी केली. चालताना, बसताना, बोलताना, जेवण करताना असावध असणारा, स्वतःची पूर्ण खात्री झाल्याशिवाय, पहिल्या व विचार केल्याशिवाय कृती करणारा हिंसा करत असतो असे त्यांचे मत होते. दुःखास सर्वच जीव घाबरत असतात हे लक्षात घेऊन कोणत्याही जीवास कष्ट पोहचवणे टाळावे असे ते आपल्या प्रवचनात नेहमी सांगत.





श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

# एकल महिलांना लवकरच कौशल्य विकास प्रशिक्षण- देशमुख



**अकोले । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमात एकल महिलांना प्राधान्याने प्रशिक्षण देण्याचा निर्णय झाला असून त्याची सुरुवात अकोले तालुक्यातील एकल महिलांपासून करतो आहोत अशी घोषणा कौशल्य विकास कार्यक्रमाचे जिल्हा अशासकीय सदस्य विनायक देशमुख यांनी केली.

अकोले येथे साऊ एकल महिला समिती आयोजित एकल महिलांच्या सभेत ते बोलत होते. रोजगार करण्यास उत्सुक असलेल्या तालुक्यातील एकल महिला या सभेला उपस्थित होत्या. देशमुख यांनी महिला सध्या करत असलेल्या कामाविषयी, त्यांना कोणते प्रशिक्षण आवश्यक आहे याची सविस्तर माहिती घेतली. या महिलांचे सूक्ष्म सर्वेक्षण सुरू करण्याचे एकल महिला समितीला सांगितले. स्वागत एकल महिला समितीच्या प्रतिमा कुलकर्णी यांनी केले. प्रास्ताविक करताना हेरंब कुलकर्णी यांनी एकल महिलांचे रोजगार हेच पुनर्वसन असल्याने तालुक्यातील किमान १०० व्यवसाय सुरू करण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत.

त्यानंतर महिलांनी व्यवसाय सुरू करण्याविषयी त्यांच्या अडचणी मांडल्या.कोणता व्यवसाय सुरू करणार ? याविषयी त्यांचे कल सांगितले. विनायक देशमुख यांनी त्याबाबत लवकरच प्रशिक्षण सुरू होतील असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष वसंत मनकर यांनी व्यवसाय सुरू करण्याबाबत व मार्केटिंगविषयी मदत करण्याची तयारी दर्शवली. ग्रामीण भागातून निर्माण होणारा माल शहरी भागात विकण्याची साखळी तयार करण्याची आवश्यकता मांडली. त्यानंतर निलेश तळेकर, भाऊसाहेब वाकचौरे, नवनाथ नेहे, सरपंच रवी मालुंजकर, मनोज गायकवाड यांनी विविध सूचना केल्या. यावेळी नगरसेवक प्रतिभा मनकर, पत्रकार श्रीनिवास रेणुकादास उपस्थित होते. पत्रकार विद्याचंद्र सातपुते यांनी व्यावसायिक मार्गदर्शन करून कार्यक्रमाचा समारोप केला.

# शिंगणापूर - राहुरी अतिक्रमण कारवाईला १५ एप्रिलपर्यंत उच्च न्यायालयाची स्थगिती

**नेवासा । विजय खंडागळे**

सोनई येथील सामाजिक कार्यकर्ते प्रकाश शेटे यांनी औरंगाबाद खंडपीठ येथे ४४१६/२०२५ क्रमांकाची अतिक्रमण काढण्याच्या विरोधात याचिका दाखल केली होती. त्यामध्ये माननीय उच्च न्यायालयात याचिका कर्ते प्रकाश शेटे व इतर शेतकरी तसेच प्रॉपर्टी कार्ड धारक यांच्या वतीने ॲड. अजित काळे यांनी काम पाहिले. काळे हे शेतकरी संघटनेचे राज्याचे मोठे नेते आहेत व प्रख्यात वकीलही आहेत अनेक प्रश्नांवर त्यांनी शेतकऱ्यांना नेहमी न्याय मिळवून देण्याची भूमिका घेतलेली आहे त्यामुळे या अतिक्रमण मुद्द्यावर त्यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले.

त्यामध्ये अतिक्रमणाचा नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनीची मोठी लूट सरकार करत आहे तसेच बेकायदेशीर हस्तांतरित झाल्याबाबतचे अनेक मुद्दे तसेच पूर्वी रस्ता छोटा होता त्यानंतर प्रमुख जिल्हा मार्ग झाल्याच्या त्यानंतर राज्य मार्ग त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग हे सर्व रस्ते करीत असताना कुठल्याही प्रकारचे नियम शासनाने पाळलेले दिसत नाही त्यामध्ये शेतकऱ्यांच्या जमिनींचे हस्तांतरित करीत असताना अनेक ठिकाणी शासनाचे दुटप्पी धोरण कसे आहे याबाबत माननीय न्यायालयाच्या विचाराधीन आणून दिले. तसेच सर्व नोटीस या बेकायदेशीर आहेत. याबाबत युक्तिवाद झाला त्यानंतर माननीय न्यायालयाने १५ एप्रिल पर्यंत कुठलेही अतिक्रमण सोनई- राहुरी -शनिशिंगणापूर रोडवरील काढता येणार नाही ,याबाबत आदेश दिले व संबंधित विभागांना तशा नोटीसा बजावण्याचे आदेश दिले.

त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी प्रकाश शेटे यांचे आभार व्यक्त केले व व्यापारी वर्गानेही त्यांचे कौतुक केले. तसेच सदर याचिकेमध्ये या व्यतिरिक्त इतरही मार्गांचे मुद्दे प्रकाश शेटे यांनी मांडले आहेत त्यामध्ये सोनईला गावाच्या इतर रस्त्याच्या बाबतीत उच्च न्यायालय काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अतिक्रमणाच्या नोटीस मिळाल्यापासून रस्त्याच्या कडेला असणाऱ्या व्यवसायिकांचा जीव टांगणीला लागला होता, माननीय उच्च न्यायालयाकडून तात्पुरता का होईना दिलासा मिळाला आहे.

# महावीर जयंती निमित्त भरगच्च कार्यक्रम; शोभायात्रा, गौतम प्रसादाचे आयोजन

**श्रीरामपूर ।शफीक बागवान**

दिगंबर जैन समाज आणि स्थानकवासी जैन संघ, संभवनाथ मूर्तीपूजकसंघ या सकल जैन संघाच्यावतीने गुरुवार दि.१० एप्रिल रोजी श्री महावीर जयंती जन्मकल्याणक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जैनस्थानक मध्ये जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त श्रमण संघाच्या जैन साध्वीजी पूज्या रमणीकमुनी सुशिष्य, तपस्वी सतेंद्रजी,सेवाभावी पू. वैभवमुनी या तीन साध्वींचे आगमन झाले आहे. गुरुवार दि.१० एप्रिल रोजी ७.३०वा. मेनरोडवरील दिगंबर जैन मंदिरापासून भगवान महावीरांच्या सजविलेल्या पालखी आणि प्रतिमेची शोभायात्रा मेनरोड, शिवाजीरोड मार्गे निघून महात्मा गांधी पुतळ्यापासून जैनमंदिराजवळ समारोप होईल. दिगंबर जैन मंदिर व संभवनाथ मूर्तीपूजक जैन मंदिरामध्ये भगवंताच्या प्रतिमेवर अभिषेक व पूजा विधी होणार आहे. तीन साध्वींच्या उपस्थितीत नवकार महामंत्र जाप, आनंद जैन पाठशाळा व आनंदामृत कन्या मंडळाचे भक्तीपर गायन होणार आहे. महासतीजींचे प्रवचन व मंगलपाठाने समारोप होईल.

दिगंबर जैन समाजासाठी माळी बोर्डिंग मंगल कार्यालयात गौरव बिपीन चुडीवाल परिवाराच्यावतीने गौतम प्रसादचे आयोजन करण्यात आले आहे. जैन स्थानकवासी समाजासाठी जैन स्थानक छत्रपती शिवाजी महाराज रोड येथे स्व. माणिकचंदजी खुशालचंदजी कर्नावट यांच्या स्मरणार्थ कर्नावट परिवाराच्यावतीने गौतम प्रसादचे आयोजन करण्यात आले आहे. शोभायात्रेत पुरुषांनी सफेद ड्रेस तर महिलांनी केसरी किंवा लाल साडी परिधान करावी तसेच शोभायात्रा कालावधीत आपापले व्यवसाय बंद ठेवावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

आजच्या सर्व कार्यक्रमात सकल जैन समाजाने सहभागी व्हावे, असे आवाहन दिगंबर जैन समाज अध्यक्ष संजय कासलीवाल, संभवनाथ मूर्तीपूजक संघ विश्वस्त शैलेश बाबरीया व स्थानकवासी जैन संघाचे विश्वस्त रमेश लोढा व स्थानकवासी जैन संघ, भारतीय जैन संघटना, वीर सेवा दल, आदर्श जैन महिला व बहुमंडळ, नवकार प्रतिष्ठाण, आनंद प्रार्थना ग्रुप, चंदना मंहिला मंडळ, शांतीसागर पाठशाळा ,महावीर युवा मंच, जैन ड्युडस्, आनंदामृत कन्या मंडळ व जैनस्थानक चौक मित्रमंडळ आदींनी केले आहे.

# अभिनेत्री डॉ. जुई जवादे यांचे २६ नोव्हेंबर चित्रपटातून पदार्पण






**मुंबई । आशीष निनगुरकर**

भारतीय संविधानाची सखोल माहिती देणारा अनिल कुमार जवादे आणि निलेश ओंकार निर्मित सचिन उराडे लिखित आणि दिग्दर्शित २६ नोव्हेंबर हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होत आहे. या चित्रपटात डॉ.जुई जवादे ही नवोदित अभिनेत्री पदार्पण करत आहे. शरद पवार डेंटल कॉलेज, सावंगी येथून डॉ.जुई यांनी बीडीएस केलं असून व्हीएसपीएम डेंटल कॉलेज, नागपूर येथे इंटरशीप केले. त्यानंतर त्यांनी दोन अनुभवी दंतचिकित्सकांच्या क्लिनिकमध्ये वर्षभर प्रॅक्टिस केली. ( Wizards of Waverly Place", "Hannah Montana) सारखे डिस्ने शो लहानपणी बघायला त्यांना आवडायचे. त्यातूनच अभिनय, डान्स, गाणी याने डॉ. जुई यांच्या मनावर खोल परिणाम केला. रोज आरशासमोर सगळं बघून त्या अभिनयाची तालीम करायला लागल्या. या दरम्यान त्यांना 'नैना' नावाचं स्क्रिप्ट मिळालं. त्यात नकारात्मक भूमिका होती म्हणून त्यांनी आधी या चित्रपटाला नकार दिला कारण त्यावेळी त्यांच्यात आत्मविश्वास नव्हता. पण कुटुंबाने समजावलं ''एकदा तरी प्रयत्न कर!'' मग त्यांनी छोटासा सराव सुरू केला, आणि डायरेक्ट कॅमेऱ्यासमोर अभिनय सुरू केला.तेथूनच त्यांचा अभिनय प्रवास सुरु झाला.

त्यानंतर त्यांना २६ नोव्हेंबर या चित्रपटात मुख्य भूमिका साकारायला मिळाली. डॉ.जुई यांनी अगोदर ( The Legit Talks ) हा टॉक शो २०२१ पासून केला आहे.त्यांचे (The Legit) हे मॅगझिन देखील कार्यरत आहे. तसेच हेल्थ आणि फिटनेस ट्रेनर म्हणून त्या गेल्या ४ वर्षांपासून कार्यरत आहेत. गेल्या दोन वर्षांपासून त्या तरुणांना टॉक शो च्या माध्यमातून योग्य संधी शोधून देण्याचं मार्गदर्शन करत आहेत. अनिल कुमार जवादे आणि निलेश ओंकार निर्मित सचिन उराडे लिखित आणि दिग्दर्शित २६ नोव्हेंबर हा घटनात्मक हक्कांची जाणीव करून देणारा महत्त्वाचा चित्रपट आहे. केवळ चित्रपट नसून,ही एक चळवळ आहे. या चित्रपटात डॉ.जुई यांच्यासोबत अनिकेत विश्वासराव, सयाजी शिंदे, विजय पाटकर, गणेश यादव, मुश्ताक खान, भारत गणेशपुरे, किशोर चौगुले, डॉ. विलास उजवणे आणि अंजली उजवणे यांसारखे प्रतिभावान कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. हा चित्रपट प्रेक्षकांना केवळ भावनिक करणार नाही, तर त्यांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्याची नवी प्रेरणा देईल, असे दिसते. चित्रपटात डॉ.जुई यांनी महत्वपूर्ण भूमिका साकारली आहे. संविधान दिन १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीप्रमाणे मोठ्या प्रमाणावर साजरा व्हावा, हाच उद्देश घेऊन निर्मिती झालेला हा सिनेमा नागरिकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देण्यासाठी उभा राहिलेला एक प्रेरणादायी आवाज आहे. येत्या मे मध्ये हा चित्रपट प्रदर्शित होत आहे.

# आंबेडकरी बाप हे आंबेडकरी साहित्यातील मैलाचा दगड ठरणारे पुस्तक



**मुंबई । दिनेश हुमणे**

ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत समाजात परिवर्तन घडवुन आणण्यासाठी ''आंबेडकरी बाप'' हे पुस्तक अत्यंत महत्वाचे असुन आंबेडकरी साहित्यातील हे पुस्तक एक मौलाचा दगड ठरणार असल्याचे महाराष्ट्र राज्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र व साधने प्रकाशन समिती सदस्य सचिव, ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत प्रदीप आगलावे प्रतिपादन केले. प्रा. शुक्राचार्य गायकवाड, सुमेरू प्रकाशन डोंबिवली यांचे आंबेडकरी बाप हे ६० वे पुस्तक प्रकाशन सोहळा सर्व्हेश हॉल डोंबिवली येथे ऐतिहासिक दस्तऐवज स्वरूपाचे प्रकाशन या स्वरूपात मुंबई मनपाचे नगर अभियंता महेंद्र उबाळे यांच्या हस्ते पार पाडला. अध्यक्षस्थानी प्रा. प्रदीप आगलावे सदस्य, सचिव डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र राज्य, प्रमुख पाहुणे म्हणुन समाजभुषण केशव भोईर, साहित्यिक विचारवंत डी. टी. गायकवाड, दामोदर मोरे तर दैनिक वृत्तरत्न सम्राटचे कार्यकारी संपादक कुणाल बबन कांबळे, प्रमुख वक्ते म्हणुन सुप्रसिध्द साहित्यिक विचारवंत भरत शिरसाठ हे उपस्थित होते. या प्रसंगी समाजातील विविध स्तरावरील मान्यवर, पुस्तकप्रेमी,उपासक,उपासिका यांच्या उपस्थितीने सर्व्हेश हॉल खच्चुन भरला होता. सुत्रसंचलन समाधान मोरे तर, आभार प्रदर्शन प्रा.संदेश गायकवाड यांनी आपल्या ओझरत्या वाणीत केले. सदरप्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते तथागतांच्या मूर्तीला व बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्य व पुष्यमाला अर्पण करून मेणबत्तीचे प्रज्वलन करण्यात आले. डॉ. सिद्धार्थ मोरे व वृषाली करलाद यांनी सुरेल आवाजात भिमगीते गाऊन उपस्थितांची मने हेलावली. उपस्थित प्रमुख पाहुणे मान्यवरांचा यथोचीत सत्कार करून त्यांना व आंबेडकरी बाप या पुस्तकातील मान्यवर लेखक डॉ.यशवंत मनोहर, डॉ.प्रदिप आगलावे, ज.वी.पवार, उषा भास्कर काळे, दीपश्री माने बलखंडे, प्रभाकर थोरात, दामोदर मोरे,धनराज डाहाट, सिताराम गायकवाड, उत्तम भगत, इंदुताई बोरकर, रमेश जाधव, जगदेव भटटु, ऍड.धम्मकिरण चन्ने, डॉ. सुरेंद्र राजाराम शिंदे, भिमराव रायभोळे, सुनिल पवार, बी. डी. जाधव, विदया भोरजारे, कांतीलाल भडांगे, शांताराम निकम, प्रभाकर गवाणकर, प्रा. भरत शिरसाठ, रेखा किशोर कांबळे, सुरेश साबळे, चंद्रकांत पोळ, कडुबा बनसोडे, आय.एम.मोरे, नारायण जाधव येळगावकर, प्रदिप जाधव, डॉ. सिध्दार्थ मोरे, सुनिता इंगळे, प्रा.विजय मोहिते, किरण सोनावणे, प्रा. डॉ.विठ्ठल शिंदे शिंदे या ३५ लेखकांना स्मृती चिन्ह ,आंबेडकरी बाप या पुस्तकाची एक प्रत देऊन सन्मानीत करण्यात आले.

अध्यक्षस्थानावरून पुढे बोलताना प्रा.आगलावे सर म्हणाले आंबेडकरी विचारांची चळवळ प्रभावीत होण्यासाठी विचाराला खतपाणी घालावे लागते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार समाजमनावर रूजवण्यासाठी साहित्यिकांनी प्रयत्न केला पाहिजे.आंबेडकरी बाप हे पुस्तक आंबेडकरी विचारांची जाणीव ठेवुन नव्या साहित्याला जन्म देत असुन पुढील पिढीत आंबेडकरी विचारधारा जिवंत ठेवुन संक्रमीक करणारे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रथांच्या विचारांवर चिंतन करून त्यानुसार (मॅनीफेस्टा) कार्यक्रमाचा जाहिरनामा करून क्रांती घडवुन आणावी हि वाटचाल असली पाहिजे. आदर्श बाप कोण हे नव्या पिढीला माहित झाले पाहिजे असे उपस्थितांशी आवाहन केले. ज्येष्ठ साहित्यिक दामोदर मोरे यांनी आंबेडकरी बाप हे शीर्षकच ऊर्जा देणारे पॉवरहाउस आहे. ते आंबेडकरी निष्ठेचे बावनकशी आंबेडकरी सोन आहे.आंबेडकरी बापांची अनेक रूपे या पुस्तकातुन पाहावयास मिळतील तेव्हा आंबेडकरी वैचारीक मुल्यांचा अभ्यास होवुन आंबेडकरी बाप असलेल्या योध्दांचे शब्दबध्द होवुन काही आंबेडकरी बाप शोधुन त्यांनाही इतिहासबध्द केले पाहिजे. प्रा. भरत शिरसाट यांनी तुफानी चौकार षटकारांची टोले बाजी करीत आंबेडकरी बाप हे शिर्षक कसे समर्पक आहे याची मुक्त उधळण करीत वंचींताचा, शोषितांचा तू सूर्याचाही बाप असल्याचे सांगुन श्रोते मनावर अभिराज्य केले. प्रा. शुक्राचार्य गायकवाड यांचे आंबेडकरी बाप हे पुस्तक त्यांच्या लेखणीच्या बळावर नविन पिढीला संक्रमीत करणार असल्याचे सांगीतले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजकांनी अथक परिश्रम घेतले.

Friends of Rayat Samachar
इंडी जर्नल वाचण्यासाठी
QR code scan करा